Historicity Research Journal | Impact Factor : 1.4152 (UIF)
ISSN : 2393-8900 | Volume - 3 | Issue - 2 | October – 2016

# देऊळगावकर जाधव घराण्याचे सामाजिक कार्य

**प्रा.राजेंद्रसिंग हिरासिंग देवरे**
प्रमुख, इतिहास विभाग , श्री व्यंकटेश महाविद्यालय , देऊळगाव राजा, जि. बुलडाणा.



**प्रस्तावना:-**

इ. स. १२०६ ला भारतात मुस्लिम सत्ता स्थापन झाल्यानंतर पुढे दक्षिण भारत व महाराष्ट्रावरही मुस्लिमांची सत्ता स्थापन झाली. या मुस्लिम सत्तांमध्ये स्वतःच्या कर्तबगारीने अनेक मराठा घराणी उदयास आली, त्यातील एक राजे लखुजीरावांचे 'जाधव घराणे' होय. इ. स. १५७६ ला लखुजी जाधवराव सिंदखेडचे वतनदार म्हणून येथे सहपरिवार स्थायिक झाल्याने या घराण्यास इतिहासात 'सिंदखेडकर जाधव' म्हणून ओळखले जाऊ लागले.[१] मध्ययुगात सर्वत्र जहागिरदारी- वतनदारी प्रथेचे प्राबल्य होते. आणि जहागिरदार- वतनदार स्थानिक पातळीवरचे खऱ्या अर्थाने सत्ताधिश असल्याने केंद्रीय सत्ताही त्यांना वचकून असे. मात्र, हे जहागिरदार- वतनदार धर्माने हिंदू असो किंवा मुस्लिम, त्यांची वृत्ती समान होती, ती म्हणजे स्थानिक जनतेची पिळवणूक करणे व चैनी -विलासी जीवन जगणे. जाधव घराणे मात्र त्यास अपवाद असल्याचे दिसते, कारण आपल्या वतनाचा कारभार पाहताना त्यांनी जनतेची पिळवणूक न करता जनकल्याणाचे धोरण स्वीकारून जनतेला आधार देण्याचे कार्य केले होते. म्हणूनच ज्या पध्दतीने राजे लखुजी जाधवराव व त्यांच्या वारसदारांनी हिंदवी स्वराज्य व यावनी सत्तांमध्ये केलेल्या लष्करी कामगिरीची नोंद सुवर्णाक्षराने घेतली जाते, 'वीर रत्नाची खाण' म्हणून त्यांना ओळखले जाते. त्याचपध्दतीने आपल्या वतनाचा कारभार पाहताना 'रयतेचे कल्याण' हा दृष्टीकोन समोर ठेवल्याने त्यांच्या हातून आजही 'समाज आणि राष्ट्रहितास' साह्यभूत ठरणारे सामाजिक कार्य घडून येऊ शकले, ते प्रकाशात आणण्यासाठी प्रस्तुत 'देऊळगावकर जाधव घराण्याचे सामाजिक कार्य' हा शोध निबंधाचा प्रपंच हाती घेतला.

## ➢ देऊळगाव राजा येथे जाधव घराण्याचा उदय :

जालन्यापासून २७ किमी. अंतरावर असलेले विदर्भाचे प्रवेशव्दार म्हणून ओळखले जाणारे ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभलेले आजचे देऊळगाव राजा (जि. बुलडाणा) हे इतिहास प्रसिध्द जाधव घराण्याचे वास्तव्याचे ठिकाण म्हणून इतिहासात प्रसिध्द आहे. आजच्या देऊळगाव राजाचे प्राचीन नाव देऊळी असल्याचे दिसते. मात्र, राव जगदेवराव हे वास्तव्यास आल्याने देऊळी 'देऊळगाव राजा' असे नामकरण झाले. आज हे तालुक्याचे ठिकाण म्हणून प्रसिध्द आहे.

२५ जूलै, १६२९ रोजी सिंदखेडकर जाधव घराण्यातील लखुजी जाधवराव त्यांचे पुत्र राघोजी व अचलोजी आणि नातू यशवंत यांना दौलताबाद येथे निजामशहाने विश्वासघाताने ठार मारले. त्यानंतर इ. स. १६३३ मध्ये जाधव घराण्यात वतनाच्या वाटण्या होऊन आडगाव राजा, मेहुणा राजा व सिंदखेड राजा येथे लखुजी पुत्राच्या तीन शाखा व लखुजी बंधू भुतजीच्या पुत्राची किनगाव राजाची शाखा अशा चार शाखा सिंदखेडच्या परिसरात अस्तित्वात आल्या.[२] त्यापैकी लखुजी पुत्र राघोजीच्या वारसांची शाखा सिंदखेड राजा येथे स्थायिक झाली. पुढे राघोजीचा नातू व दत्ताजी पुत्र राव जगदेवराव यांच्या काळात सिंदखेड राजाची ही शाखा देऊळी ऊर्फ देऊळगाव राजा येथे स्थलांतरीत झाल्याने ही शाखा इतिहासात 'देऊळगाव राजाचे जाधव' म्हणून ओळखल्या जाऊ लागली.[३] राव जगदेवरावनंतर आपल्या वतनाचा कारभार या घराण्याने देऊळगाव राजा येथूनच पाहिला. आजही जाधव घराण्याचे देऊळगाव राजा येथे वास्तव्य असून राजे विजयसिंह जाधव हे बालाजी संस्थानचे विश्वस्त म्हणून कारभार पाहत आहेत.

## ➢ राव जगदेवराव यांच्या नावे वतनाचे फर्माण :

लखुजी राजांचा नातू व राघोजीचा पुत्र दत्ताजी हे आपले पुत्र यशवंतराव व राघोजी यांच्यासह इ. स. १६६५ च्या कुलबर्ग्याच्या युध्दात मोगलांकडून लढताना मारल्या गेले.[४] त्यानंतर मोगल बादशहाने जाधव घराण्याचे वतन जप्त केले. पुढे इ. स. १६८८ मध्ये राव जगदेवराव यांनी आपल्या पराक्रमाने वागिनगिरा किल्ला जिंकून दिल्याने मोगल बादशहाने राव जगदेवराव यांच्यावर खूश होऊन त्यांच्या नावे वतनाचे फर्माण काढले. त्यामुळे तत्कालीन प्रथेनुसार वतन प्राप्तीसाठी 'सरंजामाबद्दल द्यावयाची खंडणी' (पेशकस) आणि दरबारी खर्च द्यावा लागणार होता. त्यामुळे इतर भाऊबंदकांनी खर्च भरण्यास नकार देऊन वतनाचे राजिनामे दिल्याने राव जगदेवराव यांनी हिमतीने एकटयानेच पेशकस व दरबारी खर्च म्हणून रु. ९७४९९८ /- चा भरणा केला. त्यामुळे आडगाव राजा, मेहुणा राजा, किनगाव राजा, जवळखेड व उमरदकर जाधव या भाऊबंदकांचा वतनातील हिस्सा नाहिसा होऊन सदर सिंदखेडचे वतन पूर्णतः राव जगदेवराव म्हणजेच देऊळगावकर जाधव घराण्याच्या मालकीचे झाले.[५] राव जगदेवराव यांच्यानंतरही वतनाची मालकी ही जाधव घराण्याकडेच होती. त्यांनी देऊळगाव राजा येथूनच वतनाचा कारभार पाहिला. तसेच यावेळी जाधव घराण्याचे नेतृत्त्व देऊळगावकर जाधव घराणेच करीत असल्याचे दिसते.

## ➢ जाधव घराण्याचे सामाजिक कार्य:

मध्ययुगात शेती हेच बहुसंख्य जनतेच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन होते. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढले, तर जहागिरीचे उत्पन्न वाढते म्हणजेच 'प्रजा सुखी तर राज्य सुखी' याकरीता जाधव घराण्याने आपल्या जहागिरीतील मुलूख वैराण पडू नये. सर्वत्र आबादानी राहावी. म्हणून जहागिरीतील शेतकऱ्यांना आधार दिला. शेती उत्पादनासाठी प्रोत्साहन दिले. राव जगदेवराव यांनी स्वतः सिंदखेडला चांगल्या प्रकारची फळझाडे लावून बागबगीचे तयार केले. तयार केलेल्या बागेला त्यांनी 'जगदेव' नाव दिले होते. तसेच नामांकित आंब्याची झाडे लावून आमराई तयार केली, त्यासाठी त्यांनी चार लक्ष रु. खर्च केल्याची नोंद सापडते.[६]

जाधव घराण्याच्या बखरीत राव जगदेवराव यांच्या शेतीसंबंधीच्या धोरणाचा उल्लेख सापडतो. तो असा, "गावची जमीन आफ्तदा (पडीक) पडली होती व पाणी जनावरे यास मोकळे नाही. तलाव व विहिरी तयार केल्या, त्यास सहा लक्ष रु. खर्च झाला. जमीन त्याचे खाली निघाली, त्यात विहिरी बालसमुद्र व गंगासागर वगैरे करून बागाईत काहडले. या खेरीज तळ्याचा पाट चालता केला. त्याचेही पाणी इनामात पोचते करून, जमीन अठराशे (१८००) बिघे गायराण जमीन हफ्तदा होती. ती बरोबर चांगली करून, बागाईत रास जमीन करून, नवीन कारकिर्द केली."[७] याशिवाय राव जगदेवराव यांच्या काळात त्यांचा कारभारी रासोजी जाधव याने देऊळगाव राजा येथे साळी, कोळी, ब्राम्हण व वाणी वगैरे लोकांना घरे बांधून दिल्याचे व जमीन नेमून दिल्याचेही स्पष्ट होते.[८] त्याकाळी राज्यहितासाठी जनतेपेक्षा तलवारीचे बळ अधिक महत्त्वाचे असल्याने राज्यकर्त्यांना सामान्य जनतेशी फारसे देणे- घेणे नव्हते. आजच्याप्रमाणे तत्काळात जनतेचा राज्यकर्त्यांवर दबाव नव्हता. राजा किंवा एखादा जहागिरदार, वतनदार स्वतःच्या मर्जीनुसार राज्यकारभार करू शकत होता. दरबारामध्ये जनतेच्या अडीअडचणी समजून घेणे किंवा न घेणे हे त्याच्यावर अवलंबून होते. देऊळगावकर जाधव घराणे मात्र गरीबांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मदत करणारे घराणे होते. सिंदखेडकर जाधव बखरीत राव जगदेवराव यांची दिनचर्या दिली आहे. त्यामध्ये " साहा घटका दिवस राहिला म्हणजे दरबार आम व्हावा" असे म्हटले आहे.[९] यावरून राव जगदेवराव यांनी जनतेसाठी दरबार खुला करून, त्यांच्या अडचणी ऐकूण घेऊन, त्या सोडविण्यासाठी खास वेळ राखून ठेवला होता, असे दिसते. आम जनतेसाठी राजदरबार खुला करण्याची राव जगदेवराव यांची प्रथा पुढील काळात त्यांच्या वारसांनी जोपासल्याचे दिसते.

तत्काळात सामान्य जनता किंवा सैनिक यांची आर्थिक स्थिती बेताचीच होती. त्यामुळे घरी एखादे कार्य किंवा समारंभ असेल, तर अधिक पैशाची गरज पडत असे. राव जगदेवराव हे सर्व जाणून होते. म्हणून ते म्हणतात की, "तैनात (पगार) पाहून घरी खर्च जास्त असला तर त्याजला अधिक तैनात करावी. कार्य प्रयोजन ज्याच्या घरी असेल त्याच्या योग्यतेसारखे त्यास सरकारातून द्यावे"[१०] यावरून राव जगदेवराव यांचा आपले सैनिक व जनता यांच्याप्रति दृष्टीकोन किती उदात्त होता, हे लक्षात येते. डॉ. एस. ए. बाहेकर राव जगदेवराव यांच्याविषयी लिहितात की, "राव जगदेवाने गुणी आणि कर्तृत्ववान व्यक्तिचा गुण-गौरव करून त्यांच्या कार्याला सतत प्रोत्साहन दिले. कठीण परिस्थितीत जनतेच्या सुख-दुःखात मदतीचा हात पुढे केला. जनतेचा विश्वास संपादन केला आणि लोकहिताच्या अनेक गोष्टी केल्या."[११] डॉ. बाहेकर यांच्या या वाक्यावरून राव जगदेवराव 'जनतेचे कनवाळू' असलेले राजे असल्याचे दिसून येते.

मध्ययुगात दळणवळण साधनाचा अभाव आणि शासनकर्त्यांचे जनतेच्या संरक्षणाकडे असलेले दूर्लक्ष, यामुळे संरक्षणाच्या दृष्टीने जनतेचा कोणीही वाली नव्हता. अशा काळात जाधव घराणे आपल्या प्रदेशातील प्रजेचे चोर-लुटारू व गुन्हेगारांपासून संरक्षण व्हावे, त्यासाठी चोरी -छिनाली करणाऱ्यास राज्यातून हद्दपार केले. चोरटयास मारण्याचा व लुटण्याचा आदेश दिला. मामलेदार, मुत्सद्दी व कारखानदार यांनी अन्याय केल्यास त्यांनाही शिक्षेची तरतूद केली, प्रसंगी त्यांना चाकरीवरून कमी केल्या जाई.[१२] एकंदरीत जाधव घराण्याने आपल्या प्रदेशातील जनतेच्या हिताकडे लक्ष देऊन गुन्हेगारीमुक्त प्रशासन चालविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. त्यामुळेच जनतेच्या मनामध्ये या घराण्याविषयी आदरभाव व आपलेपणा निर्माण होऊन संकटप्रसंगी त्यांना सावखेड भोईच्या महार मंडळीने मदत केल्याचे दिसून येते.

जाधव घराणे हे धार्मिकदृष्टया अतिशय उदार असून हिंदू धर्माला मानणारे होते. त्यामध्ये राव जगदेवराव हे गिरीच्या श्री बालाजी महाराजांचे निस्सिम भक्त होते. दरवर्षी ते गिरीच्या बालाजीच्या दर्शनाला जात असे, मात्र औरंगजेबाच्या सेवेत कार्यरत असल्याने आणि औरंगजेबाचे बोलाविणे आल्यामुळे एकदा त्यांना गिरी येथे श्री बालाजी महाराजांच्या दर्शनाला जाणे शक्य झाले नाही. म्हणून त्यांना दृष्टांत झाला. त्यानुसार त्यांनी इ. स. १६९२ (शके १६१४) मध्ये देऊळगाव राजा येथेच शुभ मुहुर्तावर श्री बालाजी महाराज देवस्थानाची स्थापना केली.[१३] राव जगदेवराव यांनी देवस्थानाच्या स्थापनेनंतर पहिला लळीतोत्सव साजरा करतेवेळी देऊळगाव राजातील विविध जाती-धर्मीयांना लळीतोत्सवात सहभागी करून घेतले होते. तेव्हापासून आजपर्यंत दरवर्षी आश्विन मासी श्री बालाजी महाराजांचा लळीतोत्सव मोठया उत्साहाने साजरा केला जातो. या लळीतोत्सवाची तयारी करताना करावयाची कामे (मान व हक्क) देऊळगाव राजातील विविध जाती - धर्मिय जनतेला वाटून देऊन त्यांना या लळीतोत्सवात कोणत्याही जाती भेदाला थारा न देता सहभागी करून घेतले जाते. तेव्हापासून आजतागायत लळीतोत्सवाच्या निमित्ताने ही प्रथा चालू असून, वेगवेगळया जाती-धर्मीयांना मान व हक्क देण्यात येतात. ते पुढीलप्रमाणे.

१. माळी, मराठा समाज : सोला, नाडा वळून देणे, मंडप बांधणे, लाटांची ने-आण करणे व लाटा उभारण्यास मदत करणे.
२. साळी समाज (कोष्टी) : उत्सवात ध्वज व दिंडी धरणे व भजन तथा श्रीजीस वारा घालणे.
३. रंगारी समाज : मंडपाचे कापड रंगविणे.
४. खराट घराणे : राजघराण्याचा उत्तरकर्म व पोळयाचा मान.
५. शिंपी समाज : मंडप शिवणे
६. जैन समाज : जैन समाजातील अक्करबोटे, महाजन व खडकपूरकर परिवार - लाटांचा ध्वज बांधणे.
७. गवळी समाज : दहीहंडी लळीतास दैनिक पंचामृत.
८. तेली समाज : पालखीसमोर पलिते, तेल पुरविणे तसेच नाडा योग्य रितीने बांधणे.
९. मुस्लिम समाज (आतार) : कागदी, रंगीत मखर करून लाटावर बांधणे, चौघडा, नौबत व पानविडे पुरविणे.
१०. भोई समाज : पालखी बांधणे, दसऱ्यास पालखी खांद्यावर वाहणे.
११. सोनार समाज : वर्षात दोन वेळा दागिणे, मखर व उपकरणे उजळविणे.
१२. सावजी व सातेफळकर : पालखी सोबतचा बटवा (कानगी) सांभाळणे.
१३. चर्मकार समाज : मंडपाचे चामडी कोंडे बसविणे.
१४. मातंग समाज : पालखीसमोर वाद्य वाजविणे.
१५. सुतार समाज : नवरात्रात लाकडी मखर बसविणे.
१६. लोहार समाज : लाटांना विडया लावणे.
१७. नाभिक समाज : दिवे, मशाल, समई व दैनिक दिवाबत्ती करणे.
१८. वाणी समाज : मंडप विणणे.
१९. ब्राम्हण समाज : ब्राम्हण समाजातील विविध घराण्यांना श्री बालाजी महाराजांच्या दैनंदिन पुजेव्यतिरिक्त यात्रेच्या दरम्यानच्या धार्मिक कार्य उदा. पट्टाधिकारी, कीर्तन, प्रवचन, दैनिक पंचांग वाचन, महाकथा वाचन इत्यादी.[१४]
२०. पैठणकर घराणे : बलीप्रतिपदेच्या दिवशी बिदाईचा मान, पालखीचे आद्य दर्शन घेण्याचा मान आणि लळीतानंतर 'श्री' जीस गाभाऱ्यात नेल्यानंतर आद्य भजनाचा मान.[१५]

२१. बक्षी घराणे : दसऱ्याच्या दिवशी पहिली महापूजा, मानाचा अभिषेक, महाआरतीच्यावेळी पुजाऱ्यांकडून २५ नारळाचा प्रसाद, संस्थानकडून मानाचा धोतर जोडा.[१६]

वरील प्रमाणे राव जगदेवराव यांच्यापासून यात्रोत्सवाच्या नियोजनासाठी गावातील विविध जाती-धर्मातील जनतेला मान व काही अधिकार देऊन त्यांच्यावर यात्रोत्सवातील कार्याची जबाबदारी सोपविली. जबाबदारी सोपविलेले किंवा 'मानकरी घराणे' त्यांची जबाबदारी अतिशय मनोभावे पूर्ण करतात. त्या बदल्यात त्यांना संस्थानच्या वतीने प्रसाद म्हणून श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला जातो.

प्राचीन काळापासून भारतात जातिव्यवस्था असून त्यामध्ये उच्च-निचता होती. कनिष्ठ जातीचा स्पर्शही उच्च जातींना चालत नव्हता, अशा काळात जाधव घराण्याने या जातिसंस्थेला आपल्या प्रत्यक्ष वागणूकीतून तिलांजली देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. त्याबद्दची सविस्तर माहिती मिळते.

आज देऊळगाव राजाच्या पश्चिमेला ०३ कि. मी. अंतरावर सावखेड भोई नावाचे गाव आहे. या गावामध्ये पूर्वीपासूनच जाधव आडनाव असलेले महार जातीचे लोक राहतात. (आता त्यानी बौध्द धर्माचा स्वीकार केला आहे) त्यांना 'जाधव' हे आडनाव कसे मिळाले, याचा शोध घेतला असता, त्याचा संबंध देऊळगाव राजाच्या जाधव घराण्याशी येत असल्याचे दिसते. तो असा, दिनांक ३० सप्टेंबर ते ०१ऑक्टोबर, १७२४ असे दोन दिवस साखरखेर्डा, जि. बुलडाणा येथे निजाम, पेशवे व मोगल सैन्यात निकराचे युध्द झाले. मोगल सैन्याचे नेतृत्व जाधव घराण्यातील राघोजी जाधवराव यांचेकडे होते. या लढाईत दि. ०१ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी राजे राघोजीराव धारातिर्थी पडले. त्यानंतर बाजीराव पेशवे व निजाम यांनी लष्करास राजे राघोजी यांचे कुटुंब धरून आणण्याचा व राजवाडे, महाल व खजीना लुटण्याचे आदेश दिले. शत्रू लष्कर येण्यापूर्वीच या लढाईत हजर असलेले, तुळसाजी भोसले व तुकोजी बाबा बक्षी यांनी फकीराचे वेषात येऊन सदरील वर्तमन राजे राघोजी यांच्या आई दुर्गाऊ साहेब व राणी अंबिकाबाई यांना सांगितले. वर्तमानाचे गांभीर्य ओळखून राणी अंबिकाबाई यांनी राजे राघोजींच्या मृत्युचा बदला घेण्याचा आग्रह सोडून देऊन राजस्त्रियांची अब्रू वाचविण्यासाठी व बाल राजे मानसिंगराव यांच्या रक्षणार्थ राणी अंबिकाबाईसह राजपरिवारातील सर्वांनी सावखेड या गावातील महार वस्तीत जाऊन आश्रय घेतला. सोबत हत्ती - घोडयावर लादलेला खजीनाही होता. शत्रू सन्याला शोध लागू नये, ओळख पटू नये म्हणून राजस्त्रियांना व बाल राजे मान्‌सिंग यांना महार कुटुंबियांचे वस्त्र घालावयास दिले. दोन-तीन दिवस राजपरिवाराचा सावखेड येथेच मुक्काम होता. या काळात निजाम व पेशवे यांच्या सैनिकांनी सिंदखेड राजा व देऊळगाव राजा येथील राजवाडे लुटले व खजीना घेऊन ते निघून गेले. देऊळगाव राजा येथून शत्रू निघून गेल्यानंतर सावखेडच्या महार स्त्री -पुरुषांनी राजपरिवाराला सातारा येथे छत्रपती शाहू राजे हे राणी अंबिकाबाई यांचे भाऊ असल्याने त्यांच्या आश्रयास पोहोचविण्यासाठी पालख्यांची व्यवस्था केली. सावखेड ते सातारा या संपूर्ण प्रवासात महार स्त्री -पुरुषांनी शस्त्रसज्ज अवस्थेत पुरुष मंडळी पालख्यांच्या समोर, तर स्त्रियांनी पालख्यांसोबत चालत राहून राजपरिवाराचे रक्षण केले. या प्रवासादरम्यान राजदरबारातील देऊळगाव राजा येथील गणेश गिरीधर, तुकोजी बाबा देव व मुकुंदपंत ही मंडळी आपल्या लवाजम्यासह सोबत होती. अतिशय खडतर लपून - छपून प्रवास करत सर्व लवाजमा व महार मंडळी छत्रपती शाहू राजे यांचेकडे पोहोचली. यावेळी शाहू राजे यांनी पालखी वाहक व स्त्री-पुरुष सैनिक म्हणून सोबत असलेल्या सर्व महार मंडळींना राजवाड्यात मुक्कामास ठेवून त्यांचा आदर- सत्कार केला. इकडे सावखेड येथील महार मंडळींनी राजाच्या खजिन्याचे रक्षण केले. सावखेड येथील महार मंडळींनी आपल्या प्राणाची पर्वा न करता तसेच कोणताही जातीभेद न मानता राणी अंबिकाबाई, बाल राजे मानसिंग व इतर राजपरिवारातील सदस्यांचे रक्षण करून त्यांना सावखेड येथून साताऱ्याला सुखरूप पोहचविले. त्यांच्या या शौर्याची दखल घेऊन, त्याची स्मृती म्हणून महार मंडळीना सिंदखेड राजा व देऊळगाव राजा येथील जाधवरावांचे भाऊ समजून त्यांना राजांचे 'जाधव' आडनाव दिले. इ. स. १७२४ पासून सावखेड येथील महार मंडळी 'जाधव' या आडनावाने ओळखली जावू लागली. जाधव आडनाव स्वीकारून व छत्रपती शाहू राजे यांचा आदर -सत्कार स्वीकारून महार मंडळी सावखेड येथे परत आली.[१७] इतिहासामध्ये अनेक कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या कुटुंबांनी राजकुटुंबाला प्रसंगी मदत केली असेल, मात्र एखाद्या राजपरिवाराने जाती भेदाच्या सर्व मर्यादा तोडून त्या कुटुंबाला आपले आडनाव देऊन व त्यांचा एवढा मोठा आदर - सत्कार केल्याचे उदाहरण सापडत नाही. खरोखरच तत्काळात त्यांच्या हातून सामाजिक समतेसाठी झालेले हे मोठे कार्य म्हणावे लागेल.

अतिशय शौर्याने जीवावर उदार होऊन सावखेड येथील महारांनी राज परिवारातील स्त्री -पुरुषांचे रक्षण केले. त्यांच्या या शौर्याची व उपकाराची आठवण म्हणून किंवा त्यांच्या स्मृतीचे जतन म्हणून देऊळगाव राजा येथील जाधव राजे दरवर्षी राजदरबार भरवित असत. ह्या दरबारात बहुतेक जाधव राजाच्या जहागिरीतील महार समाजाच्या अडीअडचणीवर विचार करून त्यावर जाधव राजे न्यायनिवाडा देत असावे. हा दरबार सावखेड भोई येथील महार वस्तीच्या पश्चिमेला भरत असे. जाधव राजे ज्या आसनावर बसून न्यायनिवाडा देत असे, ती आसनाची जागा अतिशय आकर्षक व राजवैभवाला शोभेल, अशा प्रकारची असल्याचे सावखेड भोई येथील जाणकार सांगतात. इ. स. १९९३ पर्यंत हे आसन चांगल्या स्थितीत होते. परंतु, आज सदर आसनाच्या जवळपास एक दिड -एकर जागेवर अतिक्रमण करून शेती केल्या जात असल्याने आपल्या पूर्वजांनी महत्प्रयासाने निर्माण केलेला आदर्श इतिहासाचा समृध्द ठेवा अशाप्रकारे नष्ट झाला.[१८] त्यामुळे जाधव घराण्याच्या उपकारकर्त्याचे जाण ठेवणाऱ्या जाणिवांची आणि सावखेडकर महार व देऊळगावकर जाधव यांच्यातील सामाजिक समतेचे दर्शन घडविणाऱ्या ऐतिहासिक संबंधाची जतन केलेली स्मृतीही नष्ट झाली.

## ➢ निष्कर्ष :

जाधव घराण्याच्या काळी महाराष्ट्रात सर्वत्र मुस्लिमांची सत्ता होती. हे मुस्लिम सत्ताधिश धर्मांध असल्याने हिंदू जनतेला काफीर समजून त्यांच्यावर अन्याय -अत्याचार करीत होते. राज्यकर्तेच अन्यायकारी असल्याने जनतेचा कुणी वाली नव्हता. अशा वेळी जाधव घराण्याने आपल्या वतनातील जनतेच्या कल्याणाकडे लक्ष देऊन त्यांन्च्यावर कोणी अन्याय -अत्याचार करत असेल, तर त्याचा बंदोबस्त करून जनतेवरील अन्याय दूर केला. शिवाय अडीअडचणीच्यावेळी जनतेला मदत करीत असल्याने जनतेला या घराण्याचा मोठा आधार वाटत होता. प्राचीन काळापासून प्रचलित असलेल्या वर्ण व्यवस्थेमुळे भारतीय समाज विविध जाती समूहात विभागला जाऊन समाजातील एकसंघपणा नाहीसा झाला. त्यामुळे मध्ययुगात देश अगोदर मुस्लिमांच्या व नंतर ब्रिटिशांच्या ताब्यात जाऊन मूळ भारतीयांच्या नशिबी गुलामगिरी आली. परंतु, हे सर्व आपल्या विषमतेवर आधारित समाज व्यवस्थेमुळे झाले किंवा राष्ट्रहिताच्या दृष्टीने जातीय उतरंडीचा फोलपणा स्पष्ट होऊनही, हे जाती व्यवस्थेमुळे झाले, असे कोणाला वाटत नव्हते. अशा कालखंडात देऊळगावकर जाधव घराण्याने बालाजी यात्रोत्सवात देऊळगाव राजातील विविध जाती-धर्मियांना काही 'मान-पान, अधिकार' दिल्याने आणि सावखेडच्या महारांना आपले 'जाधव' हे आडनाव दिल्याने प्राचीन काळापासून भारतीय समाजात प्रचलित असलेली जातियतेची शृंखला तुटण्यास मदत झाली. तसेच समाजात समता आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी पोषक वातावरण निर्माण होण्यास मदत झाली. मात्र, जाधव घराण्याने हे कार्य समाजात समता निर्माण होऊन राष्ट्रहितास हातभार लागावा, या उद्देशाने केले नव्हते. समतेचे महत्त्व न पटण्याचा तो कालखंड असल्याने देऊळगावकर जाधव घराण्याच्या समतावादी व राष्ट्रीय एकात्मतेस हातभार लावणाऱ्या कार्याची तत्काळात फारशी गरज वाटत नसली, तरी आजच्या आधुनिक युगात मात्र भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात राष्ट्रीय एकात्मता व त्याव्दारे राष्ट्र विकास साधण्यासाठी जनतेमध्ये निर्माण होणाऱ्या जातीय सलोख्याचे महत्त्व पटल्याने जाधव घराण्याच्या हातून केवळ समाज भावनेने घडलेल्या कार्याची महती लक्षात येते.

## ➢ संदर्भ सूची


१. जाधराव उ.वि., राजे जाधवरावांचे घराणे/सिंदखेड राजाचा इतिहास, १९७३, पृ. ०३

२. देशमुख विजय, सिंदखेड राजा, संचालक पुरातत्व व वस्तु संग्रहालय विभाग, मुंबई- १९८२, पृ. ०६
काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास, बुलडाणा, पृ. ३२९

३. लांडगे दे. गो., सगदेव, डोळके (संपा.), विदर्भ संशोधन मंडळ वार्षिकांक, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, १९५९, पृ. १६३- १६४

४. जोशी द. प., जोशी उषा (संपा.), समग्र सेतुमाधवराव पगडी, खंड-२, मराठी साहित्य परिषद(आ. प्र.) हैद्राबाद- २०१०, पृ. ७३२

५. बाहेकर एस. ए., सिंदखेडकर जाधव घराण्याचा चिकित्सक इतिहास, भाग-१, कसब प्रकाशन, जळगांव -२००१, पृ. १३४-१३५

६. महाजन द. बा. (संपा.), सिंदखेडकर जाधव घराण्याची बखर, यवतमाळ, १९६४, पृ.२८

७. कित्ता, पृ. २८-२९

८. कित्ता, पृ. ०४

९. कित्ता, पृ. ३१

१०. कित्ता, पृ. ३३

११. बाहेकर एस. ए., पूर्वोक्त, पृ. १४६

१२. कित्ता, पृ. ३३

१३. महाजन द. बा., पूर्वोक्त, पृ. ३५

१४. गोंदकर श्री. अ., श्री बालाजी दर्शन, संवाद प्रकाशन, देऊळगाव राजा, २१ नोव्हेंबर २०१२, पृ.३४-३५

१५. पैठणकर महाराज यांनी लिहून दिलेली माहिती.

१६. उदय बक्षी यांची मुलाखत

१७. बुलडाणा येथील इतिहास संशोधक पी. एन. मोरे यांनी बुलडाणा जिल्हा गॅझेटिअरसाठी महाराष्ट्र शासनाच्या दर्शनिका विभागाला पाठविलेला 'सावखेड भोईच्या महारांनी जाधव परिवाराचे रक्षण कसे केले' ? या संदर्भातील लेख.

१८. सा. बुलडाणा पत्रिकेमध्ये रविवार, दि. २०/०६/१९९३ ला प्रकाशित झालेला इतिहास संशोधक पी. एन. मोरे, बुलडाणा यांचा लेख, तसेच श्री. हंडे यांची मुलाखत.